# निविदा सुचना

**विषय :- विस्तार शिक्षण संचालनालय, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला या कार्यालयाकरीता कंत्राटी पध्दतीने बाहयस्त्रोतामार्फत मुनष्यबळ (कुशल / अकुशल कामगार) पुरविण्याकरीता दरपत्रक सादर करणेबाबत.**

या सुचनेव्दारे, **विस्तार शिक्षण संचालनालय, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला** या कार्यालयाकरीता कंत्राटदार / संस्था बाहयस्त्रोताकडुन मुनष्यबळ (कुशल आणि अकुशल कामगार/मजूर) पुरविण्याकरीता खालील तक्त्यात नमुद केल्यानुसार दरपत्रक या कार्यालयास दिनांक २०/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत **विस्तार शिक्षण संचालनालय, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला** येथे सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये सादर करावे. अंतिम दिनांकानंतर प्राप्त दरपत्रक ग्राहय धरण्यात येणार नाही.

| अ.क्र. | मनुष्यबळ | संख्या | कामाचा वेळ प्रती व्यक्ती | शेरा |
|---|---|---|---|---|
| **खालील नुसार कुशल कामगार /मजुर** | | | | |
| १ | कुशल कामगार | ०१ | ८ तास | |
| २ | अकुशल कामगार | ०१ | ८ तास | |

**कंत्राटदाराने दरपत्रकामध्ये दर नमुद करण्यापुर्वी खालील सुचना, शर्ती व अटींचे काळजीपूर्वक अवलोकन करावे.**

**सुचना :**

१. कार्यालयीन गरजेनुसार तसेच अनुदान उपलब्धतेनुसार वरील तक्त्यात नमुद मनुष्यबळ संख्या कमी अथवा जास्त होण्याची शक्यता असेल.

२. दरपत्रके अंतिम दिनांकापर्यंत कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेतच स्विकारले जातील, शासकीय सुटीच्या दिवशी स्विकारण्यात येणार नाहीत.

३. किमान वेतन अधिनियम १९४८ च्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या उद्योग उर्जा व कामगार विभागाची अधिसुचना दि. ०४/०२/२०२६ मध्ये नमुद दरांचे अवलोकन करावे.

४. दरपत्रके सिलंबद पाकीटात पाठवावीत, दरपत्रकांमध्ये या निविदा सुचनेचा संदर्भ क्रमांक व दिनांक नमुद करावा नमुद दर सर्व करांसहीत असावेत तसेच दरपत्रकासोबत सर्व आवश्यक प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

५. दरपत्रके संचालक विस्तार शिक्षण, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या नावाने दयावे तसेच पाकीटावर ''कंत्राटी तत्वावर बाहयस्त्रोतामार्फत मनुष्यबळ पुरविण्याकरीता दरपत्रक'' असे नमुद करावे तसेच दरपत्रकावर संबंधिताचा मोबाईल नंबर नमुद करावा.

६. दरपत्रकाचे दर ३१ मार्च, २०२७ पंर्यत वैध राहतील.

७. कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचे अथवा अस्विकार करण्याचे तसेच निविदा प्रक्रीया कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीत अधिका-यांकडे राखीव ठेवण्यात आले आहेत.

**शर्ती व अटी:-**

१. सदर कामे कार्यालयीन दैनदिन स्वरुपाची असतील व शासकीय नियमाप्रमाणे प्रतीदिन आठ तासाचे काम असेल.
२. एखादया कंत्राटी मजुरास कुठल्याही दिवशी कामावर हजर राहणे शक्य नसल्यास अशा परिस्थितीत पर्यायी व्यक्तिची व्यवस्था किंवा कामावर हजेरी लावण्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेची असेल.
३. सदर कामे ही पूर्णत: बाहयस्त्रोता मार्फत कंत्राटी पध्दतीने करावयाची असल्याकारणाने मजुराच्या वरिष्ठता यादीत कामाची अथवा कामावरच्या हजेरीची नोंद होणार नाही व तसा कुठलाही दावा करता येणार नाही.
४. कोणत्याही कंत्राटी कामगारास कामावर ठेवणे वा काढुन टाकणे याबाबत संपूर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीत अधिका-यांकडे असतील.
५. कामावरील कंत्राटी कामगारास अपघात वीमा, महागाई भत्ता, भविष्य निर्वाह निधी खाते व वेळोवेळी शासन निर्णयानुसार कंत्राटी मजुराचे देय लाभ उपलब्ध करुन देण्याची संपूर्ण जबाबदारी सेवा पुरविणारा कंत्राटदार/संस्था यांची राहील.
६. कामावरील कंत्राटी कामगारास शासन नियमानुसार वेतन देण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदार/संस्थेची असेल कंत्राटदाराने कामगारास अदा केलेल्या दरमहा भविष्य निर्वाह निधी, गट विमा पावती, वेतन व इतर देय लाभ भरल्यास पावती दरमहा देणे बंधनकारक राहील. त्याशिवाय पुढील महिन्याचे वेतन देयक अदा करण्यात येणार नाही.
७. सदर मनुष्यबळ पुरविणारी संस्था नोंदणीकृत असणे बंधनकारक असून, नोंदणी प्रमाणपत्र दरपत्रकासोबत जोडण्यात यावे.
८. दरपत्रकासोबत पुढील नमुद प्रमाणे स्वाक्षांकीत सत्यपती सादर कराव्यात : मनुष्यबळ पुरविण्याचा परवान्याची सत्यप्रत, पॅन कार्ड, आधारकार्ड, भविष्य निर्वाह निधी प्रमाणपत्र, व्यवसायकर नोंदणी प्रमाणपत्र, २०२२-२३ व २०२४-२५ भरलेले आयकर विवरण पत्र, ई. एस.आय.सी. नोंदणी प्रमाणपत्र आणि जी.एस.टी नोंदणी प्रमाणपत्र आर्दीच्या स्वाक्षांकीत सत्यप्रती.
९. संचालक विस्तार शिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला व्दारे निश्चित केलेल्या नियम व अटी मान्य असल्याचे प्रमाणपत्र तसेच कोणत्याही शासकीय /निमशासकीय कार्यालयाच्या काळया यादीत नाव नसल्याचे स्वयंघोषीत प्रमाणपत्र कंत्राटदाराने सादर करावे.
१०. कंत्राटदाराने दरपत्रकात कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन व कामगार कायदयातील इतर तरतुदीपेक्षा कमी रक्कम नमुद करू नये थोडक्यात कृषि विद्यापीठ यांच्यासाठी निर्धारीत केलेले दर नमुद करावेत. कंत्राटदाराचे कमीशनवरच दरपत्रक निश्चित करण्यात येईल. किमान वेतन कायदयानुसार कंत्राटी कामगारास वेतन देणे बंधनकारक राहील.
११. सेवा पुरविणा-या कंत्राटदारास बाल मजुर कायदयाचे पालन करणे बंधनकारक राहील.
१२. कंत्राटदाराने नेमलेल्या कामगाराचा पगार, रजा, ग्रॅच्युएटी, बोनस, विमा योजना, पि.एफ, ई. एस.आय.सी इत्यादी देय बाबी तसेच वेळोवेळी शासनाच्या निर्देशानुसार देय/वेतन देण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदारांची राहील याबाबतीत काही तंटा निर्माण झाल्यास कार्यालय हस्तक्षेप करणार नाहीत अथवा कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची अथवा विद्यापीठाची राहणार नाही.
१३. कंत्राटदाराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी कामगार किमान वेतन कायदयानुसार आवश्यक ते सर्व अभिलेख उदा. हजेरी नोंद, वेतन वाटप नोंद, दैनदिन कामाच्या नोंदी इत्यादी नोंद वहया ठेवणे व ते संबंधीत प्राधिकरणाव्दारे तपासुन घेणे बंधनकारक असून, त्याची सर्वस्वी जाबाबदारी कंत्राटदार/पुरवठादाराची राहील.
१४. कामगारच्या वैयक्तीक खात्यावर पि.एफ. विमा व इतर भरणा केलेले चलान/पावती प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवडयात देयक सादर करतेवेळी सादर करणे बधंनकारक राहील.

१५. प्रत्येक कामगारास साप्ताहिक सुटटी देणे बंधनकारक राहील याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारांची राहील.

१६. शासकीय विमा निधी व कामगार कायद्यानुसार शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या नियंमाची पूर्तता करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१७. प्रत्येक कामगारास कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट मधील नमुन्याप्रमाणे ओळखपत्र देणे कंत्राटदारास बंधनकारक असुन कामाच्या दिवशी सदरील ओळखपत्र कामगाराकडे असणे गरजेचे आहे.

१८. कंत्राटी मजुरास काम करतेवेळी इजा,अपघात अथवा मुत्यू संभविल्यास किंवा नैसर्गिक आपत्ती उदा. विज, पाऊस भूकंप, मशीनरी, प्राणी आणि वादळामुळे इजा, अपघात अथवा मुत्यु संभविल्यास त्याची सर्व भरपाई आणि इतर कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील याचा या कार्यालयाशी अथवा विद्यापीठाशी कुठलाही प्रकारचा संबंध राहणार नाही.

१९. कंत्राटी पध्दतीने मजुर पुरवठा करण्याचे काम सबकॉन्ट्रॅक्टर/कंपनी किंवा इतर व्यक्तींना देता येणार नाही तसे केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीतांचा करार रद्द करण्यात येईल आणि त्यांनतर कार्यालयाचा तसेच विद्यापीठाच्या कोणत्याही प्रक्रियेत संबंधीत कंत्राटदारास भाग घेता येणार नाही.

२०. पुरविण्यात येणा-या कुशल व अकुशल मजुरांचा ई.एस.आय.सी. उतरविणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. याबाबतची संपूर्ण कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२१. दरपत्रक मजुर झाल्यानंतर कंत्राटदाराने ठरवून दिलेल्या कामाचा सर्व अटी व शर्तीचा नोटरीकृत करारनामा रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवर त्वरीत करुन दयावा लागेल.

२२. कंत्राटदाराचे काम समाधानकारक नसल्यास सदर कामाचे भुगतान करण्यात येणार नाही.

२३. कामात कुचराई व हलगर्जीपणामुळे कार्यालयाचे झालेले नुकसानानुसार दंडासह भरपाई कंत्राटदारास करावी लागेल.

२४. दरपत्रक उघडल्यानंतर किमान वेतनापेक्षा जास्त मात्र तुलनेने लघुत्तम दर सादर कर्त्याशी दराबाबत वाटाघाटीचे अधिकार दरपत्रक समितीस राहतील.

२५. कोणतेही दरपत्रक पूर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व दरपत्रक नाकारणे तसेच कोणतेही कारण न देता दरपत्रक रद्द करण्याचा अधिकार दरपत्रक समितीने राखुन ठेवला आहे.

२६. कार्यालयाकडुन विलंबाने देयक जमा झाले तरी प्रत्येक वेतन पुढील पाच तारखेपंर्यत संबंधीत मजुरांना अदा करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील किमान वेतन कायद्यानुसार अदा केल्याची माहिती ई.एस.आय.सी.पी. एफ कामगार कल्याण निधी यांची कामगारांना व त्याचे योग्य त्या शासकीय खात्याला जमा केल्याची नोंद व चलॉन प्रत्येक महिन्याच्या देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

२७. कामावर ठेवलेल्या मजुरांची हजेरी पत्रक कामाच्या प्रत्येक ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे. संबधीत कार्यालय प्रमुखास केव्हाही हजेरीपत्रक तपासण्याचा अधिकार राहील.

२८. किमान वेतन व वेतन प्रदान अधिनियमातील विहित दरानुसार विहीत वेळी ठेकेदाराने मजुरांना वेतन दयावे.

२९. कंत्राटदाराकडुन वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास अथवा कंत्राटी मजुरांचे काम समाधानकारक नसल्याचे आढळुन आल्यास सदरचा कंत्राट तातडीने रद्द करण्यात येईल.

३०. किमान वेतन व कामगार अधिनियमातील तरतुदीनुसार येणारे उत्तरदायीत्व विचारात घेवून विद्यापीठ परिपत्रक किमान वेतन दराचे अभिप्राय घेउन दरपत्रकाचे दर ठरविले जातात तसेच ठेक्यापायी निम्यात येणा-या कामगारांना किमान वेतन दराने देय रक्कम देणे बंधनकारक असल्याने, प्राप्त झालेल्या दरापेक्षा कमी येणारे दरपत्रक दर केवळ सर्वात कमी दराचे आहे म्हणून स्विकारले जाणार नाही यांची नोंद कंत्राटदारांनी घ्यावी.

३१. कंत्राटदारांचे दर कमी आहे म्हणुन त्यांनाच काम पुरविण्यात येईल असे होणार नाही तर जे कंत्राटदार किमान कायदयांतर्गत वेतन व नियमानुसार दर देतील त्यांचे दर स्विकारली जातील.

३२. कामानुसार मजुर पुरविणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. कामावर एखादया मजुराचे काम कार्यालयात असमाधानकारक वाटल्यास त्याचे जागी तात्काळ दुसरा मजुर बदलुन दयावा लागेल.

३३.इच्छुक दरपत्रक सादर कर्त्याशी आपले दरपत्रक सादर करतांना वेळोवळी निर्गमीत होणारे निर्गमीत होणारे शासकीय/विद्यापीठ/कार्यालय यांचा आदेश/अधिसुचना परिपत्रकाचे काटेकोरपणे पालक करणे तसेच किमान मुळ वेतन, विशेष भत्ता, राहणीमान भत्ता, भविष्य निर्वाह निधी व आवश्यक शासकीय सर्व कर समाविष्ट करुन दरपत्रक सादर करणे दरपत्रक सादरकर्त्यास बंधनकारक राहील.

३४.शासकीय नियमानुसार देय होणारे शासकीय कर संबंधीत दरपत्रकात नमुद केलेल्या दरात काम करावयाची समर्थता दर्शविल्यास त्यांना काम देण्याचे हक्क कार्यालयाच्या समितीस राहतील तसेच व्दितीय क्रमांकाच्या दरपत्रक धारकांने असमर्थता दर्शविल्यास तृतीस क्रमांकाच्या लघुत्तम दरपत्रक धारकाने प्रथम क्रमांकाच्या दरपत्रक धारकाच्या दरात काम करण्याची समर्थता दर्शविल्यास यांना काम देण्याचे हक्क दरपत्रक समितीस राहतील.

३५.दरपत्रकातील दर सारखे असल्यास संबंधीतांना वाटाघाटीकरीता बोलाविण्यात येवून, कंत्राटदार /संस्थेची वार्षीक उलाढाल तसेच अनुभव इ. बाबी विचारात घेवून अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार दरपत्रक समितीस राहील.

३६. कंत्राटदारांचे दर हे सन २०२६-२७ (३१ मार्च, २०२७ पर्यंत) या वर्षाकरीता लागु राहतील व शासकीय नियमानुसार किमान वेतन कायदयामध्ये होणारे बदल लागु राहतील, आणि दर जरी ३१ मार्च, २०२७ पर्यंत वैध असले तरी कामाचा कालावधी ११ महिण्याचा राहील आणि कंत्राट मुदतपूर्ण संपूष्टात आणण्याचा तसेच कंत्राटदाराची सेवा समाधान कारक असल्यास प्रथम आदेशाचा कालावधी संपूष्टात आल्यावर जास्तीत जास्त ३ महिण्यासाठी कंत्राटाचा कालावधी वाढविण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीत अधिका-यास राहील.

३७.उपरोक्त सर्व अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करणारे कंत्राटदार प्रक्रीयेमध्ये भाग घेण्यास पात्र असतील.

३८.या प्रक्रियेबाबत कुठलेही न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास अधिकार क्षेत्र अकोला जिल्हा न्यायालय राहील.